# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 07 November 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०७ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.**

********

वन रँक–वन पेन्शनच्या अंमलबजावणीला आज दहा वर्षे पूर्ण झाली. वन रँक–वन पेन्शन म्हणजे निवृत्त सैनिकांच्या धैर्य आणि बलिदानाप्रती असलेली कृतज्ञतेची भावना असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. दशकभरात लाखो निवृत्तीवेतनधारक आणि त्यांच्या कुटुंबीयांना यामुळं मदत झाल्याचं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. सैन्यदलाच्या बळकटीकरणासाठी सरकार कटीबद्ध असल्याचा पुनरुच्चार पंतप्रधान मोदींनी केला.

****

सरकार लवकरच दहशतवादविरोधी राष्ट्रीय धोरण जाहीर करणार असल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं. गृहमंत्री शहा यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं दहशतवाद विरोधी परिषदेचं उद्घाटन करण्यात आलं. तीन नव्या फौजदारी कायद्यांमुळं नागरिकांच्या अधिकारांचं रक्षण होत असल्याचं अमित शहा म्हणाले. कर्तव्य निभावत असताना शहीद झालेल्या ३६ हजारांहून अधिक पोलिसांना शहा यांनी श्रद्धांजली अर्पण केली. राष्ट्रीय तपास संस्थेनं या दोन दिवसीय परिषदेचं आयोजन केलं आहे. केंद्रीय तपास संस्थांचे अधिकारी, न्यावैद्यक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील वरिष्ठ पोलीस अधिकारी यांची परिषदेला उपस्थिती आहे.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज गोवा भेटीवर आहेत. राष्ट्रपती स्वदेशी विमानवाहू जहाज आयएनएस विक्रांतच्या विविध सरावांची पाहणी करणार आहेत. यामध्ये जमिनीवरील जहाज मोहीम, कॉम्बॅट ऑपरेशन्स, पाणबुडी ऑपरेशन्स आणि बचाव आणि मदतकार्यांचा समावेश आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आयएनएस विक्रांतची प्रथमच पाहणी करत आहेत.

****

केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून सप्टेंबर महिन्यात घेण्यात आलेल्या विविध परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. पात्र उमेदवारांना आयोगाकडून टपालाच्या माध्यमातून कळवण्यात आलं आहे. तसंच आयोगाच्या संकेतस्थळावर निकाल उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

****

जम्मू काश्मीरमध्ये ३७० कलम पुन्हा लागू केलं जाणार नाही, असं भारतीय जनता पक्षाच्या नेत्या स्मृती इराणी यांनी सांगितलं. त्या आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होत्या. ३७० कलम लागू करुन सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान करायचा का, असा सवाल उपस्थित करुन हे कलम हटवल्यामुळे राज्यातील दहशतवादी घटना कमी झाल्याचं इराणी यांनी नमूद केलं. दरम्यान, ३७० कलमाच्या पुनरूज्जीवना संदर्भातील ठरावावरून जम्मू काश्मीर विधानसभेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये झालेल्या वादामुळे आज सभागृहात गदारोळ झाला.

****

ग्राहक ओळख पटवणे- केवायसीच्या संदर्भातील काही नियमांमध्ये रिझर्व्ह बँकेने बदल केले आहेत. नवीन नियमांनुसार एखाद्या ग्राहकानं बँकेत केवायसी प्रक्रिया पूर्ण केली असेल, तर त्याला त्याच बँकेत नवीन खातं उघडताना किंवा नवीन उत्पादन अथवा सेवा घेताना पुन्हा ओळखपडताळणीसाठी ग्राहक देय परिश्रम कस्टमर ड्यू डिलिजन्स साठी अर्ज करण्याची आवश्यकता नसेल. बँकेनं ग्राहकांकडून कोणतीही अतिरिक्त किंवा सुधारित माहिती घेतल्यास ती केंद्रीय केवायसी नोंदणी केंद्रात सात दिवसांच्या आत उपलब्ध करून द्यावी, असंही रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

****

रेल्वे मंत्रालयाकडून छटपूजेनिमित्त ११ तारखेपर्यंत रेल्वेच्या १६० विशेष फेऱ्या वाढवण्यात आल्या आहेत. याशिवाय १ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर दरम्यान ७ हजार ६०० विशेष रेल्वे फेऱ्यांचं नियोजन करण्यात आलं आहे. नांदेड विभागातूही पानिपतसाठी १४ ते २० नोव्हेंबरदरम्यान चार जादा फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आल्याचं रेल्वेच्या जनसंपर्क विभागानं कळवलं आहे.

****

भाजपनेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज नांदेड जिल्ह्यात किनवट दौऱ्यावर आहेत. किनवट मतदारसंघातून भाजपचे विद्यमान आमदार भीमराव केराम

आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार प्रदिप नाईक यांच्यात लढत आहे. राष्ट्रीय समाज पक्षाकडून गोविंद जेठेवार निवडणूक लढवत आहे. किनवट इथल्या सभेनंतर फडणवीस यांच्या यवतमाळ जिल्ह्यात तीन जाहीर सभा नियोजीत आहेत.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आज दर्यापूर, तिवसा, बडनेरा विधानसभा मतदारसंघात जाहीर सभा घेत आहेत.

****

भारतीय जनता पक्षाचे भोर विधानसभा निवडणूक प्रमुख किरण दत्तात्रय दगडे पाटील आणि जुन्नर विधानसभा निवडणूक प्रमुख आशाताई बुचके यांनी आज पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा तसंच सर्व पदांचा राजीनामा दिला. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या दोन्ही पदाधिकाऱ्यांचे राजीनामे स्वीकारले.

****

प्रसिद्ध लोकगीत गायिका शारदा सिन्हा यांच्या पार्थिवावर आज पाटण्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. बिहार कोकिळा म्हणून प्रसिद्ध असलेल्या शारदा यांचं परवा मंगळवारी दिल्लीत निधन झालं.

****

परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन खो खो स्पर्धा उद्यापासून बीड इथं होणार आहेत. विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. पुरुषोत्तम झंवर यांच्या हस्ते या स्पर्धांचं उद्धाटन होणार आहे. या स्पर्धेत ३५ संघ सहभागी झाले आहेत.

****

आचारसंहिता काळात राज्यभरात सी–व्हिजिल ॲपवर एकूण दोन हजार ८३३ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी दोन हजार ८१९ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं ही माहिती दिली.

****